| CNR No.MHWR040001982020 | | | |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २६/०२/२०२० |
| | दाखल दिनांक | : | २६/०२/२०२० |
| | निकाल दिनांक | : | १०/०८/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०६ ०५ १५ |

निशाणी क्र. १२ पुढे

**नमुना क्र.३२**

**पार्ट-अ**

**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**

**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

**सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**ता. सेलु, जि. वर्धा**

**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**

न्यायनिर्णय घोषीत दिनांक १०/०८/२०२६

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१३०/२०२०)**

गुन्हा नोंद क्र. ३४१/२०१९, पोलीस स्टेशन सेलू, ता. सेलू, जि.वर्धा

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन सेलू, ता. सेलू, जि.वर्धा. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्री. व्ही.व्ही.डोरले |
| **आरोपी** | १. | **योगेश बबनराव महाकाळकर,**<br>वय — २७ वर्षे, व्यवसाय — शेती,<br>रा. वार्ड क्र.०१, रेहकी, ता. सेलू व जि. वर्धा. |
| **आरोपी तर्फे विधीज्ञ** | | श्री. आर.एस.लिल्हारे |

**भाग – ब**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २७/०७/२०१९ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २७/०७/२०१९ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | २६/०२/२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०४/०२/२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ०४/०२/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १०/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (**Set Off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | योगेश बबनराव महाकाळकर | १३/०८/२०१९ | १३/०८/२०१९ | भा.दं.वि. कलम २७९ ३३७, ३३८ मो.वा.का. चे कलम१८४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग –क

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.**

अ.**अभियोग पक्ष**

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | अक्षय ज्ञानेश्वर तळवेकर | फिर्यादी | १२ पुढे |
| २. | विक्की नारायण देवतारे | साक्षीदार | १२ पुढे |
| ३. | विश्वेश्वर दादाजी तळवेकर | जखमी साक्षीदार | १२ पुढे |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.१४ | लेखी तक्रार |
| २. | निशाणी क्र.१५ | छापील प्रथम खबरी अहवाल |

ड. भौतीक वस्तु

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | ---- | ---- |

# न्यायनिर्णय

## (घोषीत दिनांक : १०/०८/२०२६)

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

२. दि.२७/०७/२०१९ रोजी २०.१० वाजताच्या दरम्यान फिर्यादी यांचे काका नामे विश्वेश्वर दादाजी तळवेकर हे बायपास सेलुवरुन पायदळ घराकडे येत असतांना आरोपी मोटरसायकल क्र.एम.एच.३२-ए जी-३०७० चा चालक याने त्याचे ताब्यातील मोटरसायकल हयगयीने व

निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादी यांचे काका यांना मागुन धडक दिली. सदर अपघातात फिर्यादी यांचे काका हे जखमी झाले. त्यांना सेवाग्राम दवाखान्यात उपचारकरिता पाठविण्यात आला. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सेलू येथे रिपोर्ट दिली. सदरची रिपोर्ट पोलीस स्टेशन सेलू येथे अपराध क्र.३४१/२०१९ भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटरवाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केले.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. कपील मेश्राम यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. आरोपीचे वाहनाचे कागदपत्र प्राप्त केले. आरोपीला अटक करुन अटक फॉर्म तयार केले. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्याचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये आरोप ठेवुन निशाणी क्र.१२ वर आरोपीचा तपशील नोंदविला. त्यातील मजकूर आरोपीला वाचून दाखविला व त्याना मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. आरोपीने ते अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपीविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान नोंदविण्यात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात

विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.व्ही.डोरले तसेच आरोपीतर्फे विद्वान वकील आर.एस.लिल्हारे यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.३२–ए जी–३०७० ही मनुष्य जिवीतास किंवा सुरक्षीततेस धोका पोहचेल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापात अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे, अशी हयगयीने व निष्काळजीपणाने चालवून अपघात केला, त्याप्रमाणे आरोपीने भारतीय दंड विधानचे कलम २७९ अंतर्गत गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.३२–ए जी–३०७० भरधाव वेगाने बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली तसेच इतरांचे जीवन किंवा व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून दुखापत पोहोचविण्यास कारणीभूत झाले, त्याप्रमाणे आरोपीने भारतीय दंड विधानचे कलम ३३७ अंतर्गत गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.३२–ए जी–३०७० भरधाव वेगाने बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली तसेच इतरांचे जीवन किंवा व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून जखमीला जबर दुखापत पोहोचविली, त्याप्रमाणे आरोपीने भारतीय दंड विधानचे कलम ३३८ अंतर्गत गुन्हा केला ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.३२–ए जी–३०७० भरधाव वेगात हयगयीने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविले, त्याप्रमाणे आरोपीने मोटर वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे आरोपी निर्दोष मुक्त.** |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.३२–ए जी–३०७० ही मनुष्य जिवीतास किंवा सुरक्षीततेस धोका पोहचेल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापात अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे, अशी हयगयीने व निष्काळजीपणाने चालवून अपघात केला, आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.३२–ए जी–३०७० भरधाव वेगाने बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली तसेच इतरांचे जीवन किंवा व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून दुखापत पोहोचविण्यास कारणीभूत झाले, आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र.एम.एच.३२–ए जी–३०७० भरधाव वेगाने बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली तसेच इतरांचे जीवन किंवा व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून जखमीला जबर दुखापत पोहोचविली तसेच आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल

क्र.एम.एच.३२–ए जी–३०७० भरधाव वेगात हयगयीने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविले हे ही अभियोगपक्षास निःसंशयपणे सिद्ध करणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्र.१ ते ४ करीता :**

७. वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दे एकत्रात विचारार्थ घेत आहे.

८. अभियोगपक्षाने आरोपीवरील गुन्हे सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.१ अक्षय ज्ञानेश्वर तळवेकर (फिर्यादी) यांची साक्ष निशाणी क्र.१२ पुढे नोंदविण्यात आली आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, आरोपी हा रेहकीच्या राहणारा असल्यामुळे ते त्याला ओळखतात. घटना ही पाच ते सहा वर्षापुर्वीची आहे. त्यांचे काका विश्वेश्वर तळवेकर हे घरी येत असतांना आरोपीने त्याची दुचाकी वाहनाने धडक दिली. तेव्हा त्यांचे काका हे पायदळ येत होते. घटना ही रेहकी रोडवर मुनेश्वर सयाम यांच्या घरासमोर घडली होती. घटना घडली तेव्हा ते नागपूरला होते. त्यांना त्यांच्या मित्राचा फोन आल्याने ते लगेच घटनास्थळावर गेले. ते घटनास्थळावर आले तेव्हा आरोपीची गाडी व त्यांचे काकाची बॅग होती. त्यांचे काकाला त्यांचे मित्राने दवाखान्यात नेले होते. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार दिली. त्यांना सदरची तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर पोलीस पंचनामा करण्यासाठी घटनास्थळावर आले. पोलीसांना त्यांनी घटनास्थळ दाखविला

होता. पोलीसांनी त्यानंतर त्यांचे बयान नोंदविले असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु आरोपीतर्फे विद्वान वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, घटनेच्या वेळी ते नागपूरला होते. त्यांनी सदरचा अपघात प्रत्यक्ष पाहिलेला नाही. अपघात कशा झाला हे ते सांगु शकत नाही.

९. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी व अभियोगपक्ष साक्षीदार क्रमांक १ च्या साक्षीला दुजोरा मिळण्याकरिता साक्षीदार क्र.२ यांना तपासले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते आरोपीला ओळखत नाही. घटना ही पाच ते सहा वर्षापुर्वीची आहे. त्यादिवशी ते त्यांच्या घरी होते. त्यांना बाहेरुन काहीतरी जोरदार आदळल्याचा आवाज आल्याने ते बाहेर येवुन बघितले असता त्यांना दोन व्यक्ती वेगवेगळया दिशेने पळुन दिसले. एक तळवेकर काकाजी होते व दुसरा अज्ञात व्यक्ती होता. त्यांना त्याचा नाव माहित नाही. ज्ञानेश्वर तळवेकर हे पायदळ जात होते. दुसरा अज्ञात व्यक्ती त्याच्या मोटरसायकलने काकाना धडक दिल्याचे त्यांना लोकांकडुन समजले. तळवेकर काका बेशुद्ध झाले होते. त्यांनी त्यांना त्यांच्या ऑटोमध्ये टाकुन पी.एस.सी.सेलू येथे आणले होते. पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले होते असे त्यांनी सांगितले. परंतु आरोपीतर्फे विद्वान वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, ते कथीत घटनेच्या वेळी घरी होते, त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष घटना पाहिलेली नाही व त्यांना अपघात कशा झाला याबाबत सुद्धा माहिती नाही.

**१०.** अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.३ (जखमी साक्षीदार) यांना तपासले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते आरोपीला ओळखत नाही. घटना ही जुलै, २०१९ ची आहे. ते बल्लारशाहवरुन त्यांचे घरी सेलूला जात असतांना मागुन एक मोटरसायकल आली व त्यांना उडविले. त्यानंतर काय झाला हे त्यांना माहित नाही. अपघातानंतर ते बेशुद्ध झाले होते. ते आठ महिने सेवाग्राम रुग्णालयात भरती होते. त्यांना फक्त डोक्याला मार लागलेला होता. अपघात कशा मुळे झाला हे त्यांना माहित नाही असे त्यांनी सांगितले. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु अभियोगपक्षास साक्षीदाराचा उलटतपासात आरोपीविरुध्द उपयुक्त असा कोणताही मजकूर अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष आरोपीवरील गुन्हा शाबित करण्यास पुरेशी नाही.

**११.** उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ हे फिर्यादी असुन त्यांनी आरोपीतर्फे विद्वान वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात मान्य केले आहे की, घटनेच्या वेळी ते नागपूरला होते. त्यांनी सदरचा अपघात प्रत्यक्ष पाहिलेला नाही. अपघात कशा झाला हे ते सांगु शकत नाही. तसेच अभियोगपक्ष साक्षीदार क्र.२ यांनी आरोपीतर्फे विद्वान वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात मान्य केले आहे की, ते कथीत घटनेच्या वेळी घरी होते, त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष घटना पाहिलेली नाही व त्यांना अपघात कशा झाला याबाबत सुद्धा

माहिती नाही. अभियोगपक्ष साक्षीदार क्र.३ हे जखमी साक्षीदार असुन फितूर झाल्याचे दिसते. तसेच त्यांनी अभियोगपक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. त्यांच्या साक्षीनुसार अपघात कशा मुळे झाला हे त्यांना माहित नाही असे त्यांनी सांगितले. अभियोगपक्षास या साक्षीदारांकडून आरोपीविरुद्ध कोणताही ठोस व निर्विवाद पुरावा सिद्ध करता आलेला नाही. प्रस्तुतच्या प्रकरणात एकही पंच साक्षीदार तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा हे सिद्ध झालेला नाही. तसेच अभियोगपक्षाने तपासी अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांना तपासलेले नाही त्यामुळे तपासातील भरपूर सा–या गोष्टी अभिलेखावर आलेल्या नाही. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास सपशेल अपयशी ठरला आहे. तसेच प्रस्तुतच्या प्रकरणात एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही व आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने भा.दं.वि.चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ ते ४ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ बाबत :**

**१२.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१. आरोपी **योगेश बबनराव महाकाळकर** याची भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा क्र. ३४१/२०१९ भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये पोलिस स्टेशन सेलू, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.08.10 18:07:56 +0530

(एस.आर.सातभाई)

**दिनांक** : १०/०८/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
सेलू, जि.वर्धा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)